RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# भासाची नाटयक्रांती –'कर्णभार' , 'ऊरुभङगम्'

**सौ. माधवी श्रीपाद जोशी**
एफ –१ 'साईपुष्प' अपार्टमेंट,
वखारभाग, रॉकेल लाईन, सांगली

**जयन्ति ते सुकृतिनो रससिध्दाः कवीश्वराः ।**
**नास्ति येषां यषःकाये जरामरणजं भयम् ।।**[1]

'उत्तम रचना करुन रसनिर्मिती करणारे ते श्रेष्ठ कवी विजयी होतात ज्यांच्या यषरुपी शरीराला वार्धक्य व मृत्यूपासून निर्माण होणारे भय नसते ' अर्थात ते रचनाकार देहरुपाने जरी आपल्यात नसले तरी उत्तम कलाकृतीतून ते अमरच होतात. अषा अनेक संस्कृतकवी तसेच नाटककारांमध्ये कालिदास,भवभूती,भारवी, माघ, श्रीहर्ष इत्यादी नावे घेता येतील जे आपल्या कलाकृतीतून अमर झाले आहेत. मात्र या साऱ्यामध्ये ज्येष्ठ तसेच श्रेष्ठ असणारा नाटककार ''भास'' आपल्या आगळया वेगळया रचनांनी व त्याच्या नाटयक्रांतीने अमरच नव्हे तर संस्कृतप्रेमी रसिकांच्या मनात मानाचे स्थान मिळवून राहिलेला आहे.

1912 साली तिरुअनंतपुरम (त्रिवेंद्रम) येथे महामहोपाध्याय टी. गणपतिषास्त्री यांना ताडपत्रावर मल्याळी लिपीत जी 13 नाटके सापडली तीच ''भासनाटकचक्रम'' म्हणून प्रसिध्दीस येवून संषोधनाअंती ती भासाचीच आहेत हे सिध्द झाले आहे. यातून प्रत्ययास येणारे भासाचे श्रेष्ठत्व मान्य करणाऱ्या काही प्रथितयष व लोकप्रिय संस्कृत लेखकांनी भासाविषयी सार्थ गौरवोद्‌गार काढलेले आहेत.

यामध्ये महाकवी कुलगुरु कालिदास आपल्या प्रसिध्द 'मालविकाग्निंमित्रम् ' नाटकाच्या प्रारंभी आपल्या रचना रसिकांना कषा आवडतील अषी शंका व्यक्त करताना म्हणतो

**प्रथितयषसां भाससौमिल्लककविपुत्रादीनां प्रबन्धानतिक्रम्य ।**
**वर्तमानकवेः कालिदासस्य क्रियायां कथं परिषदो बहुमानः ।।**[2]

यात कालिदास म्हणतो, 'सुप्रसिध्द भास वगैरेंच्या रचना सोडून कालिदासाच्या रचना रसिकांना काषा आवडतील ? असे म्हणून भासाचे रचनाश्रेष्ठत्व व लोकप्रियता कालिदास मान्य करतो.

भासनाटकांच्या आगळेपणाची व रचनात्मक सौंदर्याची प्रषंसा दण्डीने त्याच्या 'अवन्तीसुन्दरी' या कथेत केली आहे. तर 'गीतगोविन्द ' या मधुरकाव्याचा रचयिता कवी जयदेवाने भासोहासः कविकुलगुरुः कालिदासो विलासः। या पंक्तीत भासाच्या रचनाकौषल्याचा गौरव करुन त्याला 'कविताकामिनीचा हास' म्हणून गौरविले आहे.

असा हा श्रेष्ठ नाटककार भास संस्कृत साहित्यात ओळखला जातो तो त्याच्या 'स्वप्नवासवदत्तम्' या नाटकामुळे. तरीही त्याची इतर 13 नाटके त्याच्या विद्वत्तेची , बंडखोर लेखनषैलीची ओळख करुन देतात. भासाने आपल्या नाटकांचे मूलाधार प्रामुख्याने आपले आदरणीय धर्मग्रंथ रामायण व महाभारतातून घेतले आहेत. यातील आदर्ष नायक, नायिका सोडून सर्व समाजापासून तिरस्कृत झालेले, समाजप्रेमापासून वंचित राहिलेले, परंपरागत किंवा परिचित अषा दुष्ट व्यक्तींना आपल्या नाटकाचे नायक बनवून त्यांच्याकउे नवीनच दृष्टिकोनातून पहाण्याचे भासाचे सामर्थ्य व धैर्य खरोखर मननीय आहे. याच त्याच्या धाडसातून व निर्माणषीलतेतून उदात्त दुर्योधन, मानवी कैकेयी, दाता कर्ण ही पात्रे त्याने निर्माण केली आहेत. महाभारतात त्या दुष्ट दुर्योधनाचा व कर्णाचा परिचय आपणास होतो. त्यांना भासाने बदलून त्यांचे नवे रुप समाजासमोर आणले आहे. कर्ण, दुर्योधन यासारख्या पात्रांनाही सर्वांची सहानुभूती प्राप्त होते हीच भासाची अनोखी क्रांती आहे.

भासाची 'कर्णभार' ही एक शोकात्मिका असून कर्ण हा याचा नायक म्हणून अगदी योग्यच आहे. 'कर्णाचे दातृत्व' हाच याचा एकमेव विषय आहे. 'कर्णभार' मध्ये भासाने श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील अर्जुनाचे वैक्लव्य पुढे ठेऊन नाटकाचा प्रारंभ केला आहे. नियती जन्मतःच कर्णाविरुध्द आहे. जन्मतः मातेकडून

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

त्याग, अध्ययनकाळी गुरुषाप, ऐन युध्दप्रसंगी केलेले कवचकुंडलाचे दान यामुळे नियतीच्या क्रुरतेला धैर्याने सामोरा जाणारा कर्ण साऱ्यांना पटकन भावतो.

**'हतोऽपि लभते स्वर्गं जित्वा तु लभते यषः ।।'[3]**

हे त्याचे तत्त्वज्ञान असल्याने त्याला मरणाचे भय वाटत नाही. उलट कर्ण सद्‌गुणांचा पुतळा आहे. 'अति सर्वत्र वर्जयेत् ।' हे येथे कर्णाच्या सद्‌गुणांच्या बाबत प्रत्ययास येते. त्याचे श्रेष्ठ प्रतीचे गुण इतके पराकोटीला पोहोचले आहेत की ते अवगुण ठरण्याचा धोका वास्तवात उतरलेला दिसतो. स्वतःच्या जीवनाच्या रक्षणापेक्षाही इंद्रासारख्या देवेंद्राला याचक बनवून कवचकुंडलाचे दान देवून कृतार्थ केल्याचा उन्मादी आनंद त्याला झाला आहे.

मूळ महाभारतातील कर्ण व शल्य यांचे संबंध, सूड इ. बदलून भासाने कर्ण व शल्याचे मैत्रीचे संबंध, शल्याला कर्णाविषयी वाटणारी सहानुभूती एकीकडे वर्णन करुन दुसरीकडे इंद्राला कर्णाच्या फसवणूकीबद्दल झालेला पष्चात्ताप वर्णन केल्याने कर्णाची व्यक्तिरेखा अजूनच करुण भासते.

अषा प्रकारे मूळ महाभारतातील कथानकात आवष्यक ते परिणामकारक बदल करुन भासाने कर्णाचे उदात्तीकरण केले आहे व कर्ण या पात्राला न्याय मिळवून दिला आहे.

भासाची आणखी एक नाटयक्रांती म्हणजे 'ऊरुभङगम् ' ही एकांकिका होय. भरत या नाटयाचार्यांच्या नाटयषास्त्रानुसार 'नायकाचा अंत अर्थात निधन रंगभूमीवर दाखवू नये ' हा रुढ संकेत दूर ठेवून भासाने येथे नायक दुर्योधनाचे निधन दाखवून एक धाडसी क्रांतीच केली आहे.

या एकांकिकेत सुध्दा भासाने पूर्णपणे नवा दुर्योधन जगासमोर आणावा आणि अंतिम क्षणी त्याचे उदात्तीकरण घडवावे हा हेतू धरुनच भासाने बहुतेक फेरबदल केले आहेत. महाभारतात शेवटपर्यंत मानी व ताठर रहाणारा दुर्योधन येथे दिसत नाही तर युध्दाचे वैफल्य पटलेला, पष्चात्ताप झालेला, आपला मुलगा दुर्जय याला पांडवांची सेवा करण्यास सांगणारा , बलराम व अश्वत्थाम्यास सूडभावना विसरावयास सांगणारा भासाने रंगविलेला हा दुर्योधन पूर्णपणे वेगळा आहे. यात दुर्योधनामध्ये पुत्रस्नेह, पितृभक्ती या मूल्यांचा साक्षात्कार होतो. पत्नींना धीर देताना, पित्याचे सांत्वन करताना , मानी पती, पितृवत्सल पुत्र, वीरोचित मरण लाभलेला आदर्ष योध्दा हे त्याचे व्यक्तिमत्व ठळकपणे उभे राहते. दुर्जयाषी होणाऱ्या करुण संवादात पुत्र वात्सल्य, त्यांच्या कल्याणाविषयी कणव, वैरभाव विसरुन पांडवांषी पित्याप्रमाणे वर्तन करण्याचा दिलेला आदेष यातून दुर्योधनाचे उदात्त चित्र प्रेक्षकांपुढे साकार होते.

अषा प्रकारे भासाची प्रतिभा, रचनाषक्ती इ. चा प्रत्यय त्याच्या या दोन एकांकिकांवरुन येतो. पात्रांच्या सूक्ष्म मनोभावनांचे विष्लेषण व दर्षन हे तर भासाचे असामान्य वैषिष्टय आहे. आपले सारे जीवन सत्तेच्या , अभिमानाच्या उन्मादात घालविलेला भासाचा दुर्योधन मृत्यूच्या सान्निध्यात उदात्त व आकर्षक झाला आहे.विनाष समोर दिसत असतानाही भासाच्या कर्णाला कृपणता माहित नाही. या सर्वांच्या मनाची कवाडे भासाने हलकेच उघडली आहेत. मानवी मनातील विरोधांच्या छटा भासाने हळूवारपणे चित्रित केल्या आहेत. या सर्व घटनात मानवी मनाचे गोड ,सूक्ष्म व यथार्थ दर्षन घडविले आहे.

भासाची सारीच नाटके आकर्षक वाटतात ती त्याच्या कलात्मक सौंदर्याने पण सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे त्यात एका प्रतिभासंपन्न, निर्मितीकुषल, बंडखोर परंतु जीवनमूल्यांविषयी आदर बाळगणाऱ्या श्रेष्ठ नाटककाराच्या मनाचे यथार्थ दर्षन घडते हेच होय.

## संदर्भसूची

1. सुभाषितसंग्रह
2. मालविकाग्निमित्रम्
3. कर्णभारम् – 12